### ६) शोभिवंत माशांसाठी खाद्य निर्मिती

शोभिवंत माशांच्या खाद्याचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत.

**अ)जीवंत खाद्य-** यामध्ये प्रामुख्याने मोयना, रोटीफर,टयुबीफेक्स आळ्या, इन्फोसेरिया, आर्टिमिया, गांडूळ, डांसाच्या आळ्या इत्यादीचां समावेश होतो. पाण्याने साचलेल्या डबक्यात किंवा सांडपाण्यात मोठ्या प्रमाणात आढळतात. जीवंत खाद्यामुळे पाण्याची प्रत चांगली राहुन वारंवार पाणी बदलाची गरज भासत नाही.

**ब) कृत्रिम खाद्य-** कृत्रिम खाद्य हे पूर्णत: शास्त्रीय पध्दतीने बनविले असते. कुत्रिम खाद्य हे पाण्यावर जास्त काळ तंरगणारे व खाद्यात योग्य प्रमाणात प्रथिने, कार्बोदके, चरबी, जीवनसत्वे व खनिजे असतात व ती उत्तम प्रतिची व जास्त दिवस टिकणारी असावी. बाजारामध्ये वेगवेगळ्या कंपनीची कृत्रिम खाद्य उपलब्ध आहेत.

माशांची वाढ, रंग व रोगप्रतिकार शक्ती खाद्यावर अवलंबून असते. कृत्रिम खाद्यामध्ये प्रथिनेचे प्रमाण ३० ते ४५%, कार्बोदके - ३० ते ५०% व चरबी ४ते९% या प्रमाणात असावी.

शोभिवंत माश्यांच्या संगोपन व्यवसायाचे वैशिष्टये म्हणजे कमी भाडवंलामध्ये व कमी जागे मध्ये हा व्यवसाय सुरु करता येतो या व्यवसायात प्रचंड संधी लक्षात घेवून केंद्र शासनाच्या विविध संस्थामार्फत योजना राबविल्या जातात. या मध्ये प्रामुख्याने समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकारण (MPEDA), कोचीन, राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड (NFDB), हैद्राबाद, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (NABARD),मुंबई यांचा समावेश आहे.त्यामुळे नवउद्योजक, बेरोजगार, तरुण-तरुणी, महिला बचत गट व शेतकरी या योजनांचा लाभ घेवून व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्याहित केले जाते.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर अंतर्गत कार्यरत असलेल्या मत्स्य विज्ञान महाविद्यालय उदगीर जि.लातूर येथे या व्यवसायाची निकड समजुन राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड (NFDB), हैद्राबाद, यांच्या अर्थ साह्याने 'एकात्मिक शोभिवंत माशांचे केंद्र' स्थापन केलेले आहे. सुशिक्षित बेकार युवक, महिला बचत गट, शेतकरी इत्यादी या केंद्रा मार्फत शोभिवंत माशांचे बीज निर्मिती व संगोपन या विषयी तांत्रिक ज्ञान व प्रशिक्षण दिले जाते. शोभिवंत माशांचा व्यवसाय करण्यासाठी वित्तीय अनुदान व तांत्रिक ज्ञान उपलब्ध असुन केवळ प्रबळ इच्छाशक्ती द्वारे हा व्यवसाय करून बेरोजगारीवर मात करण्यास निश्चित मदत होईल.






* लेखन *

श्री.बी.आर.खरटमोल, श्री.एम.एम.गिरकर

संपर्क

मत्स्य विज्ञान महाविद्यालय,उदगीर, जि.लातूर

दुरध्वनी क्र. (०२३८५) २५६६७२/२५६६९०



(घडीपत्रिका क्र. ६/२०१४)


कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, लातूर

मत्स्य विज्ञान महाविद्यालय

उदगीर, जि.लातूर

(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)

# शोभिवंत माशांचे पालन-

## एक उदयोन्मुख व्यवसाय




प्रकाशक

सहयोगी अधिष्ठाता

मत्स्य विज्ञान महाविद्यालय

उदगीर, जि.लातूर

## शोभिवंत माशांचे पालन- एक उदयोन्मुख व्यवसाय

भारतात शोभिवंत मासे पालन व संवर्धनाची सुरुवात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात झाली. शोभिवंत मासे पालन, त्याचे संवर्धन व त्याच्या निगडीत असलेल्या छोट्या-छोट्या गोष्टीकडे आता स्वयं रोजगाराचे साधन म्हणून पाहिले जात आहे. यामध्ये प्रामुख्याने शोभिवंत माशांचे सवंर्धन, बीजोत्पादन, मत्स्य टाकीची विक्री, त्याची सजावट, जीवंत व कृत्रिम खाद्य निर्मिती, औषधे इत्यादीचा समावेश होतो. तसेच सार्वजनिक जागी असणारे मत्स्यालय, हॉटेल, वॉटर पार्क, इत्यादी ठिकाणी असलेल्या मत्स्यालयाना देखभालाची सेवा पूरवून ज्यादा आर्थिक उत्पादनाचे साधन उपलब्ध होवू शकते.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मध्ये शोभिवंत माशांच्या व्यवसायातून होणारी उलाढाल ही लक्षणीय आहे. या मध्ये दर वर्षी वाढ होत असून भारताला मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होते. आशिया खंडामधील सिंगापूर, हाँगकाँग, मलेशिया, थाईलँन्ड, श्रीलंका हे देश शोभिवंत माशांच्या निर्यातीत अग्रेसर आहेत. या उलट मुबलक समुद्र किनारा चांगली भौगोलिक परिस्थिती आणि या व्यवसायासाठी लागणारे विपूल साधन सामग्री असून देखील आपण हवी तशी प्रगती करू शकलो नाही.

आपल्या देशाला लाभलेल्या किनाऱ्या लगत तसेच लक्षद्वीप, अंदमान निकोबार द्विपसमूह, मन्नारचे आखात व पाल्कची सामुद्रधुनी येथे खाऱ्या पाण्यातील शोभिवंत मासे मुबलक प्रमाणात आढळतात. अशा निर्यातीस आपल्या देशाला फार मोठा वाव आहे.

शोभिवंत माशांचे पालन हा भविष्यात मोठा व्यवसाय म्हणुन नावारुपास येत आहे त्याची सविस्तर तांत्रिक माहिती करुन घेणे महत्वाचे आहे. शोभिवंत माशांच्या व्यवसायामध्ये विविध व्यवसाय अंतर्भूत आहे त्याची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे

### १) शोभिवंत माशांची पैदास व विक्री:

शोभिवंत माशांची विभागणी प्रामुख्याने तीन प्रकारात केली जाते. यामध्ये प्रामुख्याने गोड्या,निमखाऱ्या खाऱ्यापाण्याचा समावेश होतो. गोड्या पाण्यामध्ये प्रामुख्याने गोल्डफिश, इंजलफिश,मोली, गप्पी, इत्यादीचा समावेश होतो. निमखाऱ्या व खाऱ्या पाण्यामध्ये मोनो इंजल, ग्लासफिश, कोंबडामासा इ. यांचा समावेश होतो.

शोभिवंत माशांच्या प्रजननाच्या पध्दतीवरून त्याचे वर्गीकरण दोन प्रकारात केले जाते.

अ) अंडी देणारे मासे- यामध्ये प्रामुख्याने गोल्डफिश,ज्वेलफिश,रासबोरा,डॅनिआ,गुरामी,कोईकार्प यांचा समावेश होतो. या प्रकारच्या माशांना मत्स्य टाकीमध्ये प्रजननासाठी विशिष्ट परिस्थिती निर्माण करावी लागते. आणि त्यानंतर माशांनी घातलेल्या अंड्याची देखभाल काळजीपूर्वक करावी लागते. अंड्यातून बाहेर आलेल्या पिलांना तीन ते चार दिवसानंतर इन्फुसोरिया व आर्टिमिया या प्रकारचे जीवंत खाद्य दिले जाते.





ब) पिल्ले देणारे मासे- यामध्ये प्रामुख्याने गप्पी, स्वोर्डटिल, मोली, प्लेटी इत्यादींचा समावेश होतो. मादींचा पोटामध्ये पिलांची वाढ होवून मादी पिलांना जन्म देते

### २) काचेच्या टाक्या बनविणे व विक्री करणे:

मत्स्य टाकी ही काचे पासून बनविली गेलेली असते. टाकीची उपलब्धता ही वेगवेगळ्या आकारामध्ये असते यामध्ये प्रामुख्याने चौकोनी, आयताकृती, त्रिकोणी, षटकोणी, गोलाकार व काचेची हंडी यांचा समावेश असतो. आयताकृती किंवा चौकोनी आकाराची मत्स्यालय खुप लोकप्रिय आहेत कारण हि वापरण्यास व देखभालीस सोपी असतात. विविध आकाराचे मत्स्यालय तयार करण्यासाठी खालील प्रकारच्या साहित्याची आवश्यकता असते.

काच सामान, चिकट पट्टी व मोजपट्टी, सिलिकॉन ट्युब व गन, हिरकणी इत्यादीचा समावेश होतो.

### ३) शोभिवंत मत्स्यपालनासाठी लागणारे साहित्य:

शोभिवंत मत्स्यपालनासाठी व मत्स्यालय उत्तम स्थितीत ठेवण्यासाठी विविध साहित्याची गरज असते. यामध्ये ठेवण्यासाठी विविध साहित्याची गरज असते. यामध्ये प्रामुख्याने खालील उपकरणांचा समावेश होतो.

अ) वायुविजन यंत्र -पाण्यातील ऑक्सीजनचे प्रमाण योग्य प्रमाणात ठेवण्याचे कार्य करतो.

ब) यांत्रिक गाळणी - हे उपकरण मत्स्यालयातील पाण्यामधील कचरा,माशांची विष्ठा व कुजलेले खाद्य काढण्याचे कार्य करते.

क) तापमान नियंत्रक- थंडीच्या महिन्यामध्ये मत्स्यलयातील पाण्याचे तापमान कमी झाल्याने माशांना रोग होण्याची शक्यता असते. या उपकरणाचा वापर पाण्याचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी करतो.

ड) जाळी - मत्स्यालयात मासे सोडण्याकरित किंवा मासे पकडण्याकरिता जाळीचा वापर करतात. मत्स्यलयातील मासे हाताळतांना नेहमी जाळीचा वापर करावा. जाळी ही विविध आकारामध्ये उपलब्ध असते.

मत्स्यालय सुंदर व विलोभनीय दिसावे म्हणुन ते सजविणे गरजेचे असते. मत्स्यालय सजावटीसाठी खालील प्रकारचे साहित्याची आवश्यकता असते. यामध्ये रंगीत वाळू, रंगीत दगडगोटे, शंख, कोरल,खेळणी, रंगीत पोस्टर्स, कृत्रिम वनस्पती इत्यादीचा समावेश होतो

### ४) मत्स्यालय व्यवस्थापन आणि निगा:

मोठ्या शहरामध्ये अत्यंत धावपळीच्या काळात मत्स्यलयाची देखभाल करणे कठिण आहे. या व्यवसायाचे तांत्रिक प्रशिक्षण घेवून हा व्यवसाय चागल्या तऱ्हेने करू शकतो.

### ५) पान वनस्पती विक्री:



नदी काठी, मोठ्या तलावात किंवा ओढ्यात वेगवेग ान वनस्पती आढळतात उदा: हायड्रीला, टायफा, इपोमियॉ,इकॉर्निया इत्यादी.या पान वनस्पतीचा उपयोग मत्स्यालय सुशोभिकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो.काही वेळा या पान वनस्पतीचा वापर मासे आपली अंडी चिकटविण्यासाठी किंवा छोट्या पिल्लांना लपण्याची जागा म्हणुन होऊ शकतो.